**नि. फौ. ख. क्र. ४९/२०२५**

**नि.क्र. २१**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. २ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** समीर रसुल शेख

**वयः** ३३ वर्षे, **व्यवसायः** शेती,

**पत्ताः** मौजे अंथुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक ०७/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. पोलीस स्टेशनमधून मी कोठेही गेलो नाही. मी पोलीस स्टेशनमध्ये पंचनाम्यावर सही केली. मी पंचनाम्यातील मजकूर वाचला नव्हता व मला पोलीसांनी देखील वाचून दाखविला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यातील मजकूर मला माहित नाही. त्यावर माझी पंच म्हूणन अ.क्र.२ वर सही आहे,सहीस **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

(सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी मदत करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. विनंतीवरून भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे परवानगी देण्यात येते.)

**<u>उलटतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०७/१० /२०२३ मी, दुसरे पंच ऋषिकेश ननवरे आणि पोलीस असे आम्ही सर्वजण शेळगाव गावच्या हद्दीत शेळगाव–अंथुर्णे कॅनॉलचे कडेला फिर्यादीच्या शेतातील विहीरीवर गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, चोरीस गेलेली इलेक्ट्रीक पाण्याची मोटार आरोपीच्या ताब्यात मिळून आली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष सदर मुद्देमाल जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझ्यासमक्ष पोलीसांनी पंचनामा तयार केला आणि तो मी वाचून, समजून, उमजून त्यावर सही केली.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी वाचल्याशिवाय कोणत्याही कागदावर सही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावर सही करणेसाठी पोलीसांनी माझ्यावर कोणताही दबाव टाकलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या परिचयाचा असल्यामुळे त्याला वाचविण्याकरिता आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीचे वकील श्री. के. एस. धापटे यांनी उलटतपास नाकारला.**

सबब, उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/–

(एस. बी. लेंडवे)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

ठिकाण इंदापूर

दिनांक ०७/०३/२०२६

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास शपथेवर</u>**

नाव–

वय– वर्षे, व्यवसाय–

रा. ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचेमार्फत सुरु –</u>**

दिनांक ००/००/०००० रोजी वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी –––––– यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे ––– गावच्या हद्दीत जगदंबा हॉटेलच्या पाठीमागे एक इसम दारु विक्री करत आहे. त्यानंतर –––– यांनी आम्हाला त्याठिकाणी जाउन छापा टाकणेचा आदेश दिला. मी दोन पंचांना फोन करुन वालचंदनगर पोलीस ठाणे येथे बोलावून घेतले व त्यांना सदरची माहिती दिली.ते पंच म्हणून स्वखुशीने हजर राहणेस तयार झाले. त्यानंतर मी, पोलीस हवालदार ––––, पोलीस शिपाई ––– असे सर्वजण खाजगी वाहनाने घटनास्थळाकडे रवाना झालो. घटनास्थळी जाउन पाहणी केली असता त्याठिकाणी एक इसम अवैध्यरित्या दारुची विक्री करत असताना मिळून आला. त्याला जागीच पकडले व त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव ––––– असे सांगितले. त्याच्या ताब्यातील बॉक्सची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारु मस्तानी संत्रा कंपनीच्या १८० मिली मापाच्या २७ बाटल्या असा एकूण रक्कम रुपये १,८९०/– किंमतीचा प्रोव्हीबिशनचा मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर मी दोन पंचासमक्ष एक बाटली सी.ए.सॅम्पल करिता काढून घेउन उर्वरित मुद्देमालाचा जप्ती पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाच्या सहया आहेत. त्यास **निशाणी क्र. ००** देण्यात येते. जप्त केलेला मुद्देमाल व आरोपी यास वालचंदनगर पोलीस ठाणे येथे घेउन आलो व मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ००** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

( एस. बी. लेंडवे)

दिनांक ००/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,

ता. इंदापूर, जि. पुणे.